# प्रेसनोट

पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर चे आस्थापनेवर **कनिष्ठ स्थापत्त्य अभियंता गट - ब** हे पद सेवाकरार पध्दतीने सेवानिवृत्त पात्र अधिकारी यांचेमधुन भरणेबाबत.

पोलीस आयुक्त अमरावती शहर कार्यालयाच्या आस्थापनेवर **कनिष्ठ स्थापत्त्य अभियंता गट-ब** चे १ पद भरण्याकरीता दिनांक 9/04/18 ते 23/04/18 चे ०५.४५ वा. पर्यंत अटी व पात्रता पुर्ण असलेल्या उमेदवारांडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

याबाबतचे अर्ज पोलीस आयुक्त अमरावती शहर यांचेकडे दिनांक 23/04/18 पर्यंत सादर करावे. उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरुन लिफाफयावर उजव्या बाजुला ठळक अक्षरात **कनिष्ठ स्थापत्त्य अभियंता गट-ब** या पदाकरीता अर्ज नमुद करुन पोलीस आयुक्त कार्यालय पोलीस मुख्यालय अमरावती शहर समोर, टी.बी. हॉस्पीटल जवळ वडाळी रोड अमरावती या पत्त्यावर दिनांक 23/04/18 चे ५.४५ वा. पोहचेल याची दक्षता घ्यावी. दिनांक 23/04/18 नंतर प्राप्त अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवराचे पत्ता असलेले २ लिफाफे अर्जासोबत जोडावेत. अर्जाचा नमुना व इतर माहिती करीता amravaticitypolice.gov.in या वेबसाईटवर FLASH या TAB वर पाहु शकता.

**(दत्तात्रय मंडलीक)**
पोलीस आयुक्त अमराती शहर

**पोलीस आयुक्त, अमरावती शहर येथील कनिष्ठ स्थापत्त्य अभियंता गट - ब हे पद सेवाकरार पध्दतीने सेवानिवृत्त पात्र अधिकारी यांचेमधुन भरणेबाबत.**

---

क्रमांक/पोआअ/प्रलि-पशा/स्था.अ.भ./ /२०१८ अमरावती शहर दिनांक

पोलीस आयुक्त अमरावती शहर कार्यालयाच्या आस्थापनेवर कनिष्ठ स्थापत्त्य अभियंता गट -ब १ पद सेवाकरार पदधतीने भरण्याकरीता खालील अटी व पात्रता पुर्ण करीत असलेल्या उमेदवारांकडुन ११ महिन्याकरीता सेवाकरार पध्दतीने नियुक्तीकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

**सुचना -:** याबाबतचे अर्ज पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर येथील प्रबधंक शाखा यांचेकडे दिनांक 23/4/18 ---- च्या कार्यालयीन वेळ संध्याकाळी ५.४५ मिनिट पर्यंत सादर करावेत उमेदवराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरुन लिफाफयात घालुन याबाबतचे अर्ज पोलीस आयुक्त अमरावती शहर यांचेकडे दिनांक ---------------- पर्यंत सादर करावे.
23/4/18

उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरुन लिफाफयावर उजव्या बाजुला ठळक अक्षरात **कनिष्ठ स्थापत्त्य अभियंता गट-ब** या पदाकरीता अर्ज नमुद करुन पोलीस आयुक्त कार्यालय पोलीस मुख्यालय अमरावती शहर समोर, टी.बी. हॉस्पीटल जवळ वडाळी रोड अमरावती या पत्त्यावर दिनांक -------------- चे ५.४५ वा. पोहचेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ---------------------- नंतर प्राप्त अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवराचे पत्ता असलेले २ लिफाफे अर्जासोबत जोडावेत. अर्जाचा नमुना व इतर माहिती करीता **amravaticitypolice.gov.in** या वेबसाईटवर FLASH या TAB वर पाहु शकता

## अटी व शर्ती -:

१ करार पदधतीने नियुक्तीचा कालमर्यादा -: **संबधित कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल**. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नुतनीकरन करता येईल मात्र एकुण कालावधी **तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.**

२ . वयोमर्यादा -: करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या **व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील** तथापी ज्या व्यक्तींच्या सेवा त्यानंतर चालु ठेवणे आवश्यक आहे. असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिका-यास एकस्तर वरिष्ठ अधिका-याच्या प्राधिका-याच्या मान्यतेने पुढे चालु ठेवता येतील मात्र कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती **वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.**

## ब - अर्हता व अनुभव -:

१-: विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव ही पुर्वअट

२-: करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३-: करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**ड) मासिक पारिश्रमीक व भत्ते -:**

**१ मासिक परीश्रमीक**

**क शासकीय /निमशासकीय सेवा -:** सेवानिवृत्त अधिका-यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमुणक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाऐवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळुन) त्यांचे मासिक पारिश्रमीक म्हणुन निश्चीत करण्यात येईल आणि एकदा निश्चीत करण्यात आलेले परिश्रमीक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.

**ख)निवृत्ती वेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा** -: ज्या सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा निवृत्ती वेतनार्ह नाहीत त्यांना करार पध्दतीने नियुक्त करतांना सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानिव निवृत्तवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्त्याची रक्कम केवळ हिशोबासाठी परिगणित करुन त्या आधारे त्यांचे मासिक परीश्रमिक निश्चीत करण्यात येईल.

**२. भत्ते -:** उक्त तरतुदीनुसार निश्चित होणा-या मासिक परिश्रमिकाची जास्तीत जास्त २५ टक्के इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम निवास भत्ता प्रवास भत्ता आणि दुरध्वनी भत्ता या भत्त्यापोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांची कार्यक्षमता कार्यकुशलता त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ.बाबी विचारात घेवुन निश्चित करण्यात येईल.

**३. प्रवास भत्ता व दैनिक भत्ते** -: करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेतनावेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

४) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळें अशा व्यक्तींना अनुज्ञेय होणा-या पारिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणा-या निवृत्ती वेतन व महागाई भत्ता यावर होणार नाही.

इ) - इतर अटी व शर्ती -:

१)-: करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीस संबधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे सामावुन घेण्याचे वा नियमीत सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार हक्क नसेल.

२)-: नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकारी राहतील.

३) -: करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

४) -: करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबध(Conflict of conflict) जाहिर करणे आवश्यक राहील.

५) -:करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

६)-: करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवुन कामाचे मुल्यमापन करतील

## स्थापत्त्य कनिष्ठ अभियंता यांच्या कर्तव्य व जवाबदा-या खालीलप्रमाणे असतील

### स्थापत्त्य कनिष्ठ अभियंता -:

A कनिष्ठ अभियंता हे पोलीस आयुक्त /पोलीस अधिक्षक यांचे नियंत्रणाखाली उपअभियंता यांचेशी समन्वय साधुन काम करतील पोलीस आयुक्त /पोलीस अधिक्षक, कार्यालयाअंतर्गत करण्यात येणा-या बांधकामाच्या जागेची पाहणी करणे बांधकामाचे नकाशे, दरपत्रके अंदाज प्रमाणातील खर्च इत्यादी बाबीसह परीपुर्ण प्रस्ताव तयार करुन संबधितास सादर करतील

B. कनिष्ठ अभियंता हे संबधित बांधकामाच्या ठीकाणी **साईट अभियंता** म्हणुन कार्य करतील .

C. बांधकाम करण्यासाठी निवड केलेल्या ठेकेदारांकडुन गुणवत्ता पुर्वक बांधकाम करुन घेतील. बांधकाम करण्यासाठी देण्यात आलेल्या वेळेत काम पुर्ण करुन घेण्यासाठी संबधित बांधकाम व्यावसाईकाशी पाठपुरावा करतील बांधकाम विहित वेळेत पुर्ण न झाल्यास संबधित अभियंता जवाबदार राहतील.

D. त्यांना बांधकामाच्या ठीकाणी दररोज देखरेख व नियंत्रण करणे आवश्यक आहे. संबधित बांधकामाच्या गुणवत्तेसाठी संबधित अभियंता जवाबदार राहील. अभियंत्याची कामगिरी ही उत्तम दर्जाची असावी.

E. पोलीस आयुक्त/अधिक्षक यांनी बांधकामासंबधि नेमुन दिलेले सर्व कामे आदेशाचे पालन विहित वेळेत पुर्ण करतील.

**टीप -: उपरोक्त प्रमाणे नेमणुकीसंदर्भातील संपुर्ण अधिकार हे पोलीस आयुक्त अमरावती शहर यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे. तसेच कोणत्याही कारणामुळे सेवाकरार पध्दतीने करण्यात येणारी पदभरती ही पुढे ढकलणे स्थगित करणे रदद करणे इत्यादीबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा पोलीस आयुक्त अमरावती शहर यांचेकडे असेल.**

(दत्तात्रय मंडलिक )
पोलीस आयुक्त अमरावती शहर

## अर्जाचा नमुना

कनिष्ठ स्थापत्त्य अभियंता गट-ब पदाकरीता अर्ज
नियुक्ती इच्छुक ठिकाण -:

एका फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाफयात जोडावा

कार्यालयीन उपयोगासाठी

अर्ज क्रमांक | | | | | | | -:

अर्ज स्विकारल्याचा दिनांक / /२०१८

अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी दिनांकांसह

सुचना -: अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत

# अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठीकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी
*आवश्यक नसेल तेथे खोडावे.

**अ - अर्जदारची वैयक्तीक माहिती -:**

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव : आडनाव : वडीलाचे/पतीचे नाव
मराठीत -: ....................................................................................................

# इंग्रजीत | | | | | | | | | | | | | | | |

२. पत्रव्यवहाराचा पत्ता ..........................................................................................

तालुका..............................जिल्हा................................. पिनकोड | | | | | | |

३. कायमचा पत्ता -: ..............................................................................................

तालुका ............................... जिल्हा ....................................... पिनकोड ......................

४. दुरध्वनी क्रमांक- लॅन्डलाईन ............................... मोबाईल क्रमांक .......................................

५. जन्मदिनांक ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ (दिवस महिना वर्ष) जन्मस्थळ -:

६. दिनांक -: रोजीचे वय : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ (दिवस महिना वर्षे)

७. लिंग -: पुरुष ☐ महिला ☐

८. धर्म -: जात-:

९.महाराष्ट्रा राज्याचे रहिवाशी आहात काय ? होय ☐ नाही ☐

योग्य असेल त्या ठीकाणी ( ) अशी खुन करावी.

अर्जदाराची शैक्षणिक माहिती

१०. शैक्षणिक अर्हता -:

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव विदयालय महाविदयाल | बोर्ड/ विदयापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दि. | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमीक शालांत प्रमाणपत्र परिक्षा इ.१०वी अथवा जुनी ११ वी परिक्षा | | | | | |
| २. उच्च माध्यमीक शालांत प्रमाणपत्र परिक्षा १२वी | | | | | |
| ३.पदवी अभियांत्रीक (कनिष्ठ स्थापत्त्य अभियंता पदासंबधि) | | | | | |

११. इतर शैक्षणिक अर्हत-:

संगणक प्रशिक्षीत आहात काय? होय ☐ नाही ☐

१२. निवृत्ती पर्यंत अभियंता पदावर सेवा केलेल्या सेवेचा तपशिल.

| आधिच्या शासकीय नोकरीमधील पदाचे नाव | सेवेत दाखल झाल्याचा दिनांक व कार्यालय | सेवेतुन निवृत्त झाल्याचा दिनांक व कार्यालय | सेवेत असतांना गंभीर शिक्षा देण्यात आली होती काय? | आधिच्या कार्यालयाकडुन विभागीय चौकशी सुरु आहे काय? | स्थापत्त्य कनिष्ठ अभियंता पदावर कीती काळ सेवा केलेली आहे. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१३.-: अ- अर्जदारांवर यापुर्वी कोणत्याही अपराधाबददल कधीही अटक करण्यात स्थानबध्द करण्यात/बदध करण्यात /सिदधदोषी ठरवण्यात आले आले काय? किंवा लोकसेवा आयोगाकडुन त्यांच्या परिक्षांना निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय? किंवा कोणत्याही विदयापीठा कडुन किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडुन/संस्थेकडुन कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/ काढुन टाकण्यात आले काय?

होय ☐

नाही

३-ब हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात विदयापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात संस्थेत उमेदवारांविरुदध कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय?

होय ☐

नाही ☐

(१३ अ किंवा १३ ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला अटक स्थानबध्दता,दंड,दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपूर्ण तपशिल आणि न्यायालय/विदयापीठ/शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणाचे स्वरुप स्पष्ट करावे.)

*** **** *****

## अर्जदाराने दयावयाचे प्रमाणपत्र

मी श्री/सौ/श्रीमती/कु./------------------------------------------------------------------------------ याद्वारे प्रतिज्ञपुर्वक असे जाहीर करतो की, वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वास पुर्वक दिलेली असुन ती खरी आहे. जाहीरातील दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड नियुक्ती रदद केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जवाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्या विरुध्द कायदेशिर कार्यवाहीस मी पात्र राहील. तसेच मी भरती प्रक्रीयेमध्ये काणेत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेल.

ठिकाण -:

दिनांक

अर्जदाराची सही

--------------------

(दिनांक सह)

सोबत -: अर्जात नमुद केलेल्या बाबीच्या आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित केलेल्या छायांकीत प्रत.

---

अमरावती

दिनांक

(दत्तात्रय मंडलिक)
पोलीस आयुक्त अमरावती शहर

5/5/18